CNR - MHKO130011492016

सदाशिव स्वामी वि. मल्लेश स्वामी

# फायनल डिक्री नं.०२/२०१७ मधील नि.क्र.२० खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज धनको यांनी नियमित दिवाणी कज्जा नंबर १००/२०१४ मधील झालेल्या तडजोड हुकूमनाम्याप्रमाणे दाव्यातील घर मिळकतीचे सरस व निरसमानाने प्रत्यक्ष वाटप होवून मिळण्याकरीता न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. धनको यांच्या कथनानुसार, सि.स.नंबर ५५० क्षेत्र २९४.०७ चौ.मी. ही घर मिळकत असून त्यामध्ये धनको व रुनको यांचा प्रत्येकी १/३ हिस्सा आहे. सदर मिळकत अंदाजे ३० ते ४० वर्षे जुनी आहे. सदर जागेचे प्रत्यक्ष वाटप होण्याकरीता न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्ती व्हावी म्हणून सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जास रुनको यांनी म्हणणे दाखल केलेले असून सदर अर्ज मंजूर करण्यास कोणतीही हरकत नसल्याचे कळविले आहे.

३. उभय बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. घर मिळकतीच्या अनुषंगाने वाटपाकरीता न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करण्यात यावी अशी तरतूद दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम १३ मध्ये नमूद आहे. रुनको यांनी सदर अर्जास हरकत घेतली नसल्याने सदरचा अर्ज घर मिळकतीचे प्रत्यक्ष वाटप करणेकरीता मंजूर करणे योग्य राहील असे वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे–

**– आदेश –**

१. अर्ज (निशाणी क्र. २०) मंजूर करण्यात येतो.

२. घर मिळकत नंबर १/ब, सि.स.नंबर ५५० क्षेत्र २९४.०७ चौ.मी. या मिळकतीच्या प्रत्यक्ष वाटपाकरीता न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करण्यात येते.

३. उभय पक्षकार यांनी एकमताने न्यायालयीन आयुक्तांचे नावे या न्यायालयास ३० दिवसांच्या आत सुचवावे.

४. धनको यांनी न्यायालयीन आयुक्तांची फी म्हणून रक्कम रुपये ३,०००/– ही ३० दिवसांच्या आत न्यायालयात जमा करावी.

५. वरील सर्व बाबींची पुर्तता झाल्यानंतर धनको यांनी नियमित दिवाणी कज्जा नंबर १००/२०१४ मधील हुकूमनाम्याची व घर मिळकतीच्या अद्ययावत प्रॉपर्टी कार्डच्या सही शिक्क्याच्या प्रती पुढील कार्यवाहीसाठी त्वरीत उपलब्ध करुन दयाव्यात.

सही/-

(ए.बी.जवळे)

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,कागल

कागल

दिनांकः– ०९/०४/२०२१